## हुच्चेश्वर नगरात तरुणीचे गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : एका २२ वर्षीय अविवाहित तरुणींने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मजरेवाडी परिसरातील हुच्चेश्वर नगरात सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. विद्या रमेश कटकधोंड (वय २२ रा. हुच्चेश्वरनगर) असे मयत तरुणींचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास तिने घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफात घेतली होती. तिला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. मयत विद्या कटकधोंड हिच्या पश्चात आई आणि भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कटके पुढील तपास करींत आहेत.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । बुधवार, दि. २ ऑक्टोबर २०२४ । वर्ष : २३ वे । अंक : ५ वा । किंमत : ५ रुपये । पाने ८

# महाआघाडीचे तुफान...

## 'हे' राक्षसी सरकार, ताईंचा हल्लाबोल

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**सोलापुरात मंगळवारी अभूतपूर्व असा मोर्चा पहायला मिळाला. महाविकास आघाडीने या मोर्चातून राज्यातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रश्नांची चिरफाड करत आघाडीच्या नेत्यांनी महायुतीच्या सरकारला इशाऱ्यांवर इशारे दिले. सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. महायुतीचे हे सरकार राक्षसी आहे. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत हे शासन घालवण्यासाठी आघाडीच्या कार्यकर्त्यांनी तयारीनिशी मैदानात उतरले पाहिजे, अशी हाक त्यांनी दिली.**

राज्यासह सोलापूरसह जिल्ह्यातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीन मंगळवारी चार हुतात्मा पुतळा चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पूनम गेटवर विशाल मोर्चा काढण्यात आला. गेटपुढे आल्यानंतर मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले.त्यावेळी खा.शिंदे यांचे आक्रमक भाषण झाले.

त्या म्हणाल्या, नितीन गडकरी म्हणतात, विविध योजनांचे अनुदान मिळणार नाही. कारण, सरकारचे सगळे पैसे लाडक्या बहिणींसाठी वापरले जात आहेत. तुम्ही आता लाडक्या बहिणींना विकत घेणार का, आम्हाला दीड हजार नव्हे तर सुरक्षा हवी आहे. हे राक्षस सरकार आहे. गुजरातमधील कांद्याची निर्यात होते. मात्र, महाराष्ट्रातील कांद्याची निर्यात केली नाही. सिंचन योजनांची पाणीपट्टी दहा टक्क्यांनी वाढवली आहे, त्याचा मी निषेध करते.

बदलापूर घटनेतील भाजपचे दोन पदाधिकारी फरारी आहेत. मात्र, अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर घडविला आहे, असे सांगून शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणाऱ्या सरकारला तोंड दाखवायची लायकी राहिली नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

या मोर्चामध्ये माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, दिलीप माने, कॉ नरसय्या आडम, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा कार्याध्यक्ष अॅड नंदकुमार पवार, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, सिध्देश्वर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी, जेष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री, महादेव कोगगुरे, शिवसेना जिल्हा अजय दासरी, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल, तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, प्रशांत साळे, अमर सूर्यवंशी, शालिवाहन माने देशमुख, भारत जाधव, संदीप पाटील, रईस टिनवाला, हरिष पाटील, महाराष्ट्र सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, मल्लिकार्जुन पाटील, महिला अध्यक्ष शाहीन शेख, महिला शहर अध्यक्ष प्रमीला तुपलवंडे, राजेश पवार, किशोर पवार, गुरुसिध्द म्हेत्रे, रविकिरण कोळेकर, अख्तरताज पाटील, राजशेखर शिवदारे, बाळासाहेब शेळके, भारत जाधव, मनोहर सपाटे, दत्तापंत वानकर, विष्णू कारमपुरी, भीमाशंकर जमादार यांच्यासह महाआघाडीचे नेते उपस्थित होते.



सोलापूर: शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर खा. शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यात त्या खांद्यावर नांगर घेऊन सहभागी झाल्या होत्या.

### विमानतळ नको, विमानसेवा हवीय

खा.प्रणिती यांनी सोलापूरच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.त्या म्हणाल्या की, आम्हाला विमानतळ नकोय, विमान सेवा हवी आहे. मी विमानतळावर बोलायला लागले की, तुमचे अक्कलकोटचे आमदार लगेच बोलायला येतील. सोलापुरात पन्नास वर्षांपासून विमानतळ आहे. मात्र, आम्हाला विमानसेवा हवी आहे. नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या विमानतळ उद्घाटनाला महायुतीचे ११ पैकी एकच आमदार उपस्थित होते. एक आमदार म्हणाला आम्हाला आमंत्रण मिळालं नाही, तर दुसरा म्हणाला मी दर्शनाला गेलोय. सत्ताधारी पक्षात ताळमेळ नाही.

### ही तर शोबाजी

खा.शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही कडाडून टीका केली.त्या म्हणाल्या की,मोदी म्हणाले होते की, यंत्रमाग कामगारांना आम्ही युनिफॉर्म शिवण्यासाठी देऊ. मात्र, मोदीजी हे यंत्रमाग कामगार केवळ टॉवेल आणि नॅपकिन तयार करतात, युनिफॉर्म नाही, ही फक्त शोबाजी आहे.

### अप्पर तहसील कार्यालय दम देऊन अनगरला नेले

मोहोळ तालुक्याचे अप्पर तहसील कार्यालय दम देऊन अनगरला घेऊन गेले आहेत. आम्हाला अप्पर तहसील कार्यालय मोहोळमध्येच हवे आहे, अशा शब्दांत खा.प्रणिती यांनी अनगर अप्पर तहसील कार्यालयावरून माजी आमदार राजन पाटील यांच्यावर नाव न घेता टीकास्त्र सोडले. प्रणिती शिंदे यांनी अनगर अप्पर तहसील कार्यालयाच्या मुद्यावरून काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी अनगर अप्पर तहसील कार्यालयाच्या बाबत फेरविचार करण्यात यावा, अशी मागणी केली होती. आता त्यांनी हे कार्यालय दमबाजी करून अनगरला नेल्याचा आरोप केला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज सुट्टी आहे, मुकाट माघारी या, अजून घरची स्वच्छता बाकी आहे!!!

| कल्याण |
| --- |
| 330-64-699 |

| मुंबई |
| --- |
| 400-49-289 |





जीवेत शरदः शतम्

आदरणीय

श्री.दशरथजी गोप साहेब

सचिव - पद्मशाली शिक्षण संस्था

यांच्या वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

पद्मशाली शिक्षण संस्था संचालित

**- महाविद्यालय विभाग -**
- अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय
- कुचन कनिष्ठ महाविद्यालय
- कुचन कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण
- सौ. भू. म. पुल्ली कन्या कनिष्ठ महाविद्यालय
- रामकृष्णपंत बेत रात्र कनिष्ठ महाविद्यालय
- देविदास न. बत्तीन तांत्रिक प्रशिक्षण विभाग

**- माध्यमिक विभाग -**
- कुचन प्रशाला
- कुचन प्रशाला - तेलुगू माध्यम
- सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशाला
- मातोश्री जनाबाई ज. बिटला प्रशाला
- रामकृष्णपंत बेत रात्र प्रशाला
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल

**प्राथमिक विभाग**
- नारायणराव कुचन प्राथमिक शाळा
- राजमल ना. बोमड्याल प्राथमिक शाळा
- रामदास न. इप्पाकायल प्राथमिक शाळा
- रामव्वाबाई रा. बुर्ला प्राथमिक शाळा
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल
- मातोश्री आशाताई अं. सरगम सेंट्रल स्कुल

**बालक मंदिर विभाग**
- भूदेवीबाई कटमक बालक मंदिर
- भारतीबाई रा. बोमड्याल बालक मंदिर
- भूदेवीबाई रा. इप्पाकायल बालक मंदिर
- रामव्वाबाई रा. बुर्ला बालक मंदिर
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल
- मातोश्री आशाताई अं. सरगम सेंट्रल स्कुल

सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद...